**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २६० । बुधवार १५ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## मोक्कातील फरार आरोपी साथीदारासह जेरबंद

### एलसीबीची कारवाई । दरोड्याचे दहा गुन्हे उघडकीस



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अकोले येथील दरोड्यासह तब्बल १० गंभीर गुन्हे उघडकीस आणत स्थानिक गुन्हे शाखेने मोक्का गुन्ह्यातील फरार मुख्य आरोपीला त्याच्या साथीदारासह जेरबंद केले आहे. अजय सादीश काळे (वय २४, रा. वाळुंज, अहिल्यानगर) आणि अक्षय उर्फ सोन्या अर्पण भोसले (वय २६, रा. घाणेगाव, पारनेर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

दिनांक १६ मे २०२६ रोजी मध्यरात्री अकोले तालुक्यातील औरंगपूर येथे अशोक केरू वाळुंज यांच्या घरावर चार अज्ञात दरोडेखोरांनी दरोडा टाकला होता. त्यांनी कपाटातील व महिलेच्या गळ्यातील सोन्या–चांदीचे दागिने आणि रोख रक्कम बळजबरीने चोरून नेली होती. याप्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या गुन्ह्याचा तांत्रिक व गुप्त बातमीदारांद्वारे तपास सुरू केला. दिनांक १४ जुलै रोजी रेकॉर्डवरील आरोपी अजय काळे हा वाळकी शिवारात येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी तातडीने सापळा रचून अजय काळे व अक्षय भोसले यांना शिताफीने ताब्यात घेतले.

तपासादरम्यान त्यांनी या दरोड्यात त्यांचे इतर ७ साथीदार असल्याची कबुली दिली. तसेच चोरीचे दागिने किरण भाऊसाहेब बेंद्रे याला विकल्याचे सांगितले. मुख्य आरोपी अजय काळे हा सुपा, पारनेर, भिंगार आणि चाकण पोलीस ठाण्यांतर्गत दरोडा, जबरी चोरी व मोक्का अशा एकूण १० गुन्ह्यांत फरार होता. या कारवाईमुळे अकोले, पारनेर, राहाता, लोणी व घारगाव परिसरातील १० गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. पुढील तपासासाठी आरोपींना अकोले पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## १३ रेखांकन मंजुरी प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याची आयुक्तांची लेखी कबुली... मग कारवाई कधी?

### सर्व मंजुऱ्या रद्द करण्याची सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांची शासनाकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत सन २०२० नंतर ०.४० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या भूखंडांना –२०२० .नगर विकास विभागाच्या दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ च्या आदेशाचे उल्लंघन करून देण्यात आलेल्या १३ तात्पुरत्या व अंतिम रेखांकन मंजुरी प्रकरणी गंभीर अनियमितता झाल्याचे स्वतः महानगरपालिका आयुक्त श्री. यशवंत डांगे यांनी शासनाला पाठविलेल्या दिनांक ७ जुलै २०२६ च्या पत्रातून मान्य केले आहे. त्यामुळे संबंधित पत्र कोणत्याही परिस्थितीत अमान्य करून सर्व मंजुऱ्या रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे.

शेख यांनी दिलेल्या निवेदनानुसार, शासनाच्या २९ नोव्हेंबर २०२२ च्या स्पष्टीकरणात्मक आदेशानुसार, ०३ डिसेंबर २०२० नंतर निर्माण झालेल्या ०.४० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या भूखंडांसाठी एकूण क्षेत्राच्या किमान १० टक्के किंवा किमान २०० चौ.मी. खुली जागा राखून ठेवणे बंधनकारक असतानाही या अटीचे पालन न करता तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचना श्री. राम चारठाणकर यांनी तात्पुरत्या मंजुऱ्या दिल्या. त्यानंतर तत्कालीन आयुक्त श्री. पंकज जावळे तसेच विद्यमान आयुक्त श्री. यशवंत डांगे व नगररचनाकार श्री. वैभव जोशी यांनी आवश्यक कायदेशीर पडताळणी न करता अंतिम मंजुऱ्या दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची तक्रार १ डिसेंबर २०२५ रोजी शासनाकडे करण्यात आली होती. त्यानंतर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांनी ८ मे २०२६ रोजी सहसंचालक नगर रचना, नाशिक श्री. आकाश बागुल यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली. मात्र चौकशी सुरू असतानाच समितीचे अध्यक्ष श्री. आकाश बागुल यांनी १९ जून २०२६ रोजी संबंधित १३ प्रकरणांना अनुकूल अभिप्राय दिल्याने निष्पक्ष चौकशीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे उल्लंघन झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

याच पार्श्वभूमीवर दिनांक ७ जुलै २०२६ रोजी शेख यांनी श्री. आकाश बागुल यांच्या कार्यपद्धतीबाबत शासनाकडे स्वतंत्र तक्रार दाखल केली. विशेष म्हणजे, त्याच दिवशी आयुक्त श्री डांगे यांनी शासनाला पत्र पाठवून संबंधित १३ रेखांकन मंजुरी प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचे मान्य करत शासनाकडे मार्गदर्शनाची विनंती केली. या दोन घडामोडी एकाच दिवशी झाल्यामुळे या संपूर्ण प्रकरणाकडे शासनाने गांभीर्याने पाहून निष्पक्ष निर्णय घ्यावा.

दरम्यान, महानगरपालिका आयुक्तांनी ७ जुलै २०२६ रोजी शासनाला पाठविलेल्या ■ पान ४ वर

## श्रीरामपूरमध्ये गांजासह एका आरोपीला अटक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने श्रीरामपूर येथे गांजा बाळगणाऱ्या एका आरोपीला मुद्देमालासह रंगेहाथ अटक केली आहे, तर त्याचा एक साथीदार फरार झाला आहे.

गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक श्रीरामपूर शहर हद्दीत गस्तीवर असताना, वार्ड नं. ०२, कुरेशी मोहल्ला येथील इरफान छोटू शेख (वय ४०) याने घरात गांजा विक्रीसाठी आणून ठेवल्याची गुप्त माहिती मिळाली. पथकाने श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या मदतीने इरफानच्या घरावर छापा टाकला.

या छाप्यात पोलिसांनी घरातून १५ हजार १२१ रुपये किमतीचा ६०४.८४ ग्रॅम गांजा, २ हजार रुपयांची रोकड आणि ५०० रुपये किमतीचा एक इलेक्ट्रॉनिक वजन काटा असा एकूण १७ हजार ६२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ■ पान ४ वर

## शंकर चौधरीवर निलंबनाची कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** गुन्हेगारांशी संपर्क ठेवल्याप्रकरणी श्रीरामपुर अप्पर पोलिस अधीक्षक कार्यायातील शंकर चौधरी याला पोलिस अधीक्षकांनी निलंबीत केले आहे. या संदर्भात पोलिस अधीक्षांकडे तक्रार करण्यात आली होती परंतु तत्कालीन पोलिस अधीकक्षक सोमनाथ घार्गे यांनी त्यावर कुठलाच निर्णय घेतला नव्हाता मात्र विद्यमान पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन चौकशीचे आदेश दिल्यावर त्याची चौकशी होऊन निलंबनाचे आदेश काढले आहे.

शंकर चौधरी याने यापुर्वी एलसीबीमध्ये नेमणुक होती. त्यानंतर बदली श्रीरामपुरच्या अप्पर पोलिस अधीक्षक कार्यालयात झाल्यावर त्या काळात गुन्हेगारांशी संबध ठेवल्याचा त्याच्यावर आरोप करण्यात आला. त्यावेळी नागरिकांनी श्रीरामपुर येथे एक मोर्चाही काढून शंकर चौधरीवर आरोप करण्यात आले होते.त्या प्रकरणात त्याची चौकशी होऊन त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

### अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक निवडणुकीची रणधुमाळी

## सेवा सोसायट्यांच्या ठरावांसाठी दिग्गजांची जोरदार फिल्डिंग



**पारनेर–** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीची रणधुमाळी आता चांगलीच रंगू लागली आहे. सेवा सहकारी सोसायट्यांचे ठराव मिळविण्यासाठी तालुकाभर मोठी हालचाल सुरू असून, प्रत्येक गटाने आपापली ताकद पणाला लावली आहे. १६ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठराव सादर करण्याची अंतिम मुदत असल्याने गावागावातील सेवा सोसायट्यांमध्ये बैठका, चर्चा आणि ठराव मंजुरीची लगबग वाढली आहे.

या निवडणुकीत खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, गीतांजली शेळके, प्रशांत गायकवाड, राहुल पाटील आणि सीताराम खिलारी यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांनी सेवा सोसायट्यांचे ठराव आपल्या बाजूने मिळविण्यासाठी जोरदार फिल्डिंग लावल्याची चर्चा सहकार वर्तुळात रंगली आहे.

तालुक्यातील विविध सेवा सोसायट्यांमध्ये सभासद, संचालक आणि पदाधिकाऱ्यांच्या बैठका सुरू असून, कोणत्या गटाला किती ठराव मिळतात याकडे राजकीय आणि सहकारी क्षेत्राचे लक्ष लागले आहे. अनेक ठिकाणी ठराव एकमताने मंजूर करण्याचे प्रयत्न होत असताना, काही ठिकाणी चुरशीची लढतही पाहायला मिळत आहे.

१६ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठराव सादर करण्याची मुदत असल्याने पुढील काही तासांत राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सेवा सोसायट्यांच्या ठरावांवरूनच जिल्हा बँक निवडणुकीचे प्रारंभीचे राजकीय चित्र स्पष्ट होणार असल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे.



**संतोष कोरडे**
दैनिक आकर्षण
उपसंपादक
९६३७६३३८७८

## यशोदा नगरात संत बहिणाबाई पायी दिंडीचे जल्लोषात स्वागत; ३०० वारकऱ्यांना महाप्रसाद

### वारी ही आधुनिक जीवनातील तणावावर नैसर्गिक उपचार; आनंदाचा खरा मार्ग अंतर्मनातच– हभप भाऊसाहेब तुपे महाराज



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संत परंपरेचा वारसा जपत पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करणाऱ्या संत बहिणाबाई पायी दिंडीचे सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवरील यशोदा नगर येथे सोमवारी नागरिकांच्या वतीने अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. ढोल–ताशे, बँड पथक, टाळ–मृदंगाच्या गजरात आणि ''ज्ञानोबा–तुकाराम''च्या अखंड जयघोषात दिंडीचे आगमन झाले. परिसरातील नागरिकांनी वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले. यावेळी सुमारे ३०० वारकरी या दिंडीत सहभागी झाले होते.

यावेळी आयोजित स्वागत सोहळ्यात हभप भाऊसाहेब तुपे महाराज यांनी उपस्थित वारकरी आणि नागरिकांना मार्गदर्शन केले. आधुनिक काळातील वाढती धावपळ, ताणतणाव आणि स्पर्धेच्या वातावरणात वारीचे महत्त्व अधिक अधोरेखित होत असल्याचे त्यांनी सांगितले. वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून माणसाच्या मनाला शांती, समाधान आणि सकारात्मक ऊर्जा देणारी जीवनशैली असल्याचे त्यांनी आपल्या प्रभावी प्रवचनातून स्पष्ट केले.

''आजचा माणूस मोबाईल, सोशल मीडियाचे आकर्षण, कामाचा वाढता ताण, स्पर्धेची धावपळ आणि भौतिक सुखांच्या मागे धावत असताना स्वतःपासूनच दूर गेला आहे. अशा परिस्थितीत वारी माणसाला स्वतःशी पुन्हा एकदा जोडण्याचे कार्य करते. काही दिवस संसारातील चिंता, व्यवसायाचा ताण आणि दैनंदिन धकाधकीपासून दूर राहून वारकरी विठ्ठलनामात रमतो. त्या नामस्मरणातून मनाला खरी विश्रांती मिळते. त्यामुळे वारी ही केवळ श्रद्धेचा प्रवास नसून मानसिक शुद्धीकरणाची आणि आत्मिक समाधानाची एक महान साधना आहे,'' असे प्रतिपादन हभप भाऊसाहेब तुपे महाराज यांनी केले.

पुढे बोलताना तुपे महाराज म्हणाले, ''आज मानसिक तणाव, नैराश्य आणि अस्वस्थता या समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यावर औषधांबरोबरच मन प्रसन्न ठेवणारे संस्कारही आवश्यक आहेत. वारी माणसाला समता, बंधुभाव, संयम, सेवा आणि प्रेमाची शिकवण देते. येथे कोणताही भेदभाव नसतो. सर्वजण विठ्ठलाचे लेकरू म्हणून एकत्र चालतात. आनंद बाहेरच्या गोष्टींमध्ये नसून तो आपल्या अंतर्मनात आहे. तो शोधण्यासाठी काही काळ थांबणे, स्वतःकडे पाहणे आणि ईश्वरनामाशी नाते जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे वारी ही आधुनिक जीवनात मानसिक आरोग्यासाठी नैसर्गिक उपचार ठरत आहे.''

यशोदा नगरातील नागरिकांनी दिंडीचे अत्यंत भक्तिमय वातावरणात स्वागत केले. बँड पथकाच्या सुरावटी, टाळ–मृदंगाचा गजर आणि विठ्ठलनामाच्या घोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. स्वागतासाठी परिसरातील नागरिक मोठ्या ■ पान ४ वर

## हजारो वारकऱ्यांची सेवा हीच आमची विठ्ठलभक्ती – योगेश गलांडे

### एमआयडीसीत उद्योजक व कामगारांनी विठ्ठलनामाच्या गजरात केले वारकऱ्यांचे जल्लोषात स्वागत





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीच्या निमित्ताने शहरात आगमन करणाऱ्या विविध दिंडींचे एमआयडीसीतील नगर–मनमाड मार्गावर उद्योजक, कामगार आणि बालाजी सेवा सोसायटीच्या वतीने अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात, टाळ–मृदुंगाच्या निनादात आणि भक्तिमय वातावरणात वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या सेवाभावी उपक्रमात विविध दिंडींमधील सुमारे १० हजारांहून अधिक वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, अल्पोपहार तसेच उपवासाचे साहित्य वाटप करण्यात आले. याचबरोबर दिंडीतील वारकरी निरोगी राहावेत आणि प्रवासात कोणत्याही आरोग्यविषयक अडचणी उद्भवू नयेत, यासाठी डॉक्टरांची विशेष टीम दिवसभर सेवेसाठी कार्यरत होती. वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचारही करण्यात आले. या उपक्रमामुळे वारकऱ्यांनी आयोजकांबद्दल समाधान व्यक्त करत सेवाभावाचे कौतुक केले.

यावेळी गगनगिरी महाराज सरला बेट पायी दिंडी सोहळ्याचेही स्वागत करण्यात आले. या प्रसंगी महंत रामगिरी महाराज यांनी या सेवाभावी उपक्रमाचे विशेष कौतुक करत सांगितले की, ''अहिल्यानगरच्या प्रवेशद्वारावरच वारकऱ्यांना प्रेम, आपुलकी आणि सेवाभावाचा अनुभव मिळणे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. वारकरी संप्रदायात सेवा हीच खरी ईश्वरभक्ती मानली जाते. हजारो वारकऱ्यांची निःस्वार्थ भावनेने सेवा करून आयोजकांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अशा उपक्रमांमुळे वारकरी परंपरेतील प्रेम, समता आणि मानवतेचे मूल्य अधिक दृढ होत असून ही सेवा पुढील अनेक वर्षे अखंडपणे सुरू राहो, अशी विठ्ठल चरणी प्रार्थना व्यक्त केली.

या स्वागत सोहळ्याला आमदार संग्राम जगताप यांनी भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, ''वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची आणि अध्यात्माची ओळख आहे. हजारो किलोमीटरचा पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करणे म्हणजे प्रत्यक्ष विठ्ठलाची सेवा करण्यासारखे आहे. बालाजी सेवा सोसायटी, उद्योजक, कामगार आणि नागरिकांनी एकत्र येऊन केलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी महापौर बाबासाहेब वाकळे व शिवसेनेचे शहर प्रमुख संभाजी कदम यांनीही या उपक्रमाला भेट देऊन समाधान व्यक्त केले. त्यांनी ''वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य प्रत्येकाला लाभत नाही. समाजातील उद्योजक, कामगार आणि नागरिकांनी एकत्र येत इतक्या मोठ्या प्रमाणावर सेवा उभारली, ही अत्यंत अभिमानाची बाब असल्याची ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी साबळे; व्हाईस चेअरमनपदी उंडे



**अहिल्यानगर - छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरच्या संचालक मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत संस्थेच्या नव्या पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यानुसार संतोष कचरू साबळे यांची चेअरमनपदी, सुधीर दशरथ उंडे यांची व्हाईस चेअरमनपदी तर गोटीराम अंकुश मडके यांची सचिवपदी फेर निवड करण्यात आली. निवडीनंतर उपस्थित संचालक व सभासदांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.पतसंस्थेच्या संचालक मंडळामध्ये ज्ञानेश्वर देवराम सुर्वे, सदानंद लहानू डोखे, सुधाकर प्रभाकर पगारे, संतोष तात्याबा थिगळे, श्रीकांत बाबासाहेब साळे, सुधीर दशरथ उंडे, संतोष कचरू साबळे, गोटीराम अंकुश मडके, रवि हरीश्चंद्र देशमुख , प्रशांत दशरथ सातपुते, प्रताप हनुमंत साबळे, नवनाथ बारकू गोरे, हरिश शिवराम भालेराव, ज्ञानदेव शिवाजी अडसुरे, किशोर किसनराव जेजुरकर, संतोष हरिभाऊ खंडागळे, संगीता किसनराव परोडकर, अर्चना प्रकाश गुंड आणि सुरेखा सदाशिव लांडगे यांचा समावेश आहे. सर्व संचालकांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात पार पडली.यावेळी या निवडीचे जिल्हाउपनिबंधक कार्यलयातील महेश पालवे यांनी काम पाहिले.नवनिर्वाचित चेअरमन संतोष साबळे यांनी निवडीनंतर बोलताना सांगितले की, ''संस्थेने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. सभासदांचे हित, आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि संस्थेची आर्थिक प्रगती या चार सूत्रांवर भर देत पतसंस्थेला अधिक सक्षम आणि आदर्श संस्था बनविण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. प्रत्येक सभासदाला विश्वास देणारा आणि विकासाभिमुख कारभार करण्याचा आमचा प्रयत्न असेल.''व्हाईस चेअरमन सुधीर उंडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी चेअरमन आणि संचालक मंडळाच्या सहकार्याने काम केले जाईल. सभासदांच्या अडचणी तत्परतेने सोडविणे, संस्थेच्या योजनांचा अधिकाधिक लाभ तळागाळातील सदस्यांपर्यंत पोहोचविणे आणि आर्थिक व्यवहार अधिक गतिमान करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. संस्थेची विश्वासार्हता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे काम करू.''**

## तोफखाना पोलीस ठाण्यात रुजू झालेले पोलिस उपनिरीक्षक बालाजी वैद्य यांचा चर्मकार विकास संघाकडून सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेले पोलिस उपनिरीक्षक बालाजी वैद्य यांचे चर्मकार विकास संघाच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. समाज आणि पोलिस प्रशासन यांच्यात समन्वय वाढवून कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा सदिच्छा भेटीचा कार्यक्रम पार पडला.

चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांच्या हस्ते पोलिस उपनिरीक्षक बालाजी वैद्य यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष कानडे, खजिनदार अरुण गाडेकर, युवा शहराध्यक्ष विनोद कांबळे, जय गायकवाड, कदम मेजर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या चर्चेत चर्मकार समाजासमोरील विविध सामाजिक, शैक्षणिक, कायदेशीर व नागरी प्रश्नांवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. समाजातील युवकांमध्ये कायद्याबाबत जनजागृती करणे, सामाजिक सलोखा वाढविणे, महिलांच्या सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच नागरिक व पोलिस यांच्यात विश्वासाचे वातावरण अधिक दृढ करण्यासाठी पुढाकार राहणार असल्याचे उपस्थितांनी स्पष्ट केले.

पोलिस उपनिरीक्षक बालाजी वैद्य म्हणाले की, ''समाजात शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षित वातावरण टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने कायद्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. पोलिस आणि नागरिक यांच्यातील समन्वय जितका मजबूत असेल, तितक्या प्रभावीपणे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविता येईल. पोलिस प्रशासन हे नागरिकांच्या सेवेसाठीच असून, समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा यासाठी पोलीस दल कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी पोलिस उपनिरीक्षक बालाजी वैद्य यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देताना सांगितले की, ''समाज आणि पोलिस यांच्यातील संवाद अधिक मजबूत होणे ही काळाची गरज आहे. चर्मकार विकास संघ सामाजिक कार्य सातत्याने कार्य करत आहे. भविष्यातही समाजहिताच्या विविध उपक्रमांसाठी पोलिस प्रशासनासोबत समन्वयाने काम केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थितांनी पोलिस उपनिरीक्षक बालाजी वैद्य यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत, समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये परस्पर सहकार्याची भूमिका कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## भिंगारमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**महिला व ज्येष्ठांसाठी एसटी कार्ड शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा सामाजिक उपक्रम**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भिंगार राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. याचबरोबर महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी प्रवास सवलत कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता, तर एसटी कार्डची प्रक्रिया घराजवळच पूर्ण झाल्याने महिला व ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

भिंगार राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शिवम भंडारी यांच्या पुढाकारातून आणि आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संपत बारस्कर, श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संजय सपकाळ, अनिल तेजी, मारुती पवार, संपत बेरड, ज्ञानेश्वर फासे, दीपक लिपाणे, सुदाम गांधले, दिनेश लंगोटे, प्रमोद जाधव, दीपक राहिंज, नवनाथ मोरे, एकनाथ मोरे, प्रज्योत लुनिया, रवी नामदे, प्रशांत डावरे, आकाश जाधव, जाधव मामा, ओम भंडारी, मिलिंद लालबोंद्रे, अनिल दळवी, गणेश उपरे, ओंकार उदबत्ते, श्रीकांत तावरे, उमेश गलांडे, भारस्कर गोत्राळ, अनिल दिवटे, आदित्य दिवटे, विजय भंडारी, सुदाम बोंदर्डे, दिलीप आस्मर, गजानन भंडारे, संदीप टेके, अनिल सोळसे, राजू कुरकुटे, रामकिसन बाबर, मीना मोरे, अलका भंडारी, सुरेखा लांडगे, राणी लोखंडे, सोनल लुणिया, शितल कांबळे यांच्यासह परिसरातील नागरिक, महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुंभार गल्ली परिसरातील महिलांनी मनोगत व्यक्त करत सांगितले की, या भागात पूर्वी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होता. पाण्यासाठी महिलांना टेकाड भागात जाऊन डोक्यावर हंडे वाहून पाणी आणावे लागत होते. मात्र आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून परिसरात सिमेंट काँक्रीटचे रस्ते, जलवाहिन्या व नियमित पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध झाली. त्यामुळे महिलांची मोठी गैरसोय दूर झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजनेचे व्हायरल पत्रक फेक!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असलेल्या मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना या नावाच्या पत्रकाबाबत महिला व बालविकास विभागाने महत्त्वाचे स्पष्टीकरण देत ही योजना पूर्णपणे बनावट असल्याचे स्पष्ट केले आहे. अशा नावाची कोणतीही योजना महाराष्ट्र शासनाच्या स्तरावर अस्तित्वात नसल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन विभागाने केले आहे.

व्हायरल पत्रकात १ मार्च २०२० नंतर जन्मलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा चार हजार रुपये आर्थिक मदत दिली जाणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच अर्जासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, जन्म प्रमाणपत्र आदी कागदपत्रे जमा करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. मात्र, या दाव्यांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्य शासनामार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना सुरू असून पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार आर्थिक मदत दिली जाते. मात्र मुख्यमंत्री बाल आशीर्वाद किंवा मुख्यमंत्री बाल संगोपन या नावाची कोणतीही नवीन योजना शासनाने सुरू केलेली नाही, असे विभागाने स्पष्ट केले.

महिला व बालविकास विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेशांवर विश्वास ठेवू नये, कोणतीही वैयक्तिक कागदपत्रे पडताळणीशिवाय जमा करू नयेत आणि कोणत्याही योजनेची माहिती संबंधित विभागाच्या अधिकृत माध्यमातूनच तपासावी. तसेच दिशाभूल करणारे संदेश पुढे पाठवणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## अहमदनगरच्या निजामशाहीची शूर वीरांगना राणी चांदबीबी

राणी चांदबीबी या हुसेन निजामशाह प्रथम यांच्या कन्या होत्या. त्यांचा विवाह विजापूरच्या आदिलशाहीतील अली आदिलशाह प्रथम यांच्याशी झाला होता. पतीच्या निधनानंतर त्यांनी काही काळ विजापूरच्या राज्यकारभाराची जबाबदारी सांभाळली. त्यानंतर त्या अहमदनगरला परतल्या आणि निजामशाहीवर आलेल्या संकटाच्या काळात त्यांनी राज्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतली.

इ.स. १५९५ मध्ये मुघल सम्राट अकबराने अहमदनगर जिंकण्यासाठी मोठे सैन्य पाठवले. त्या वेळी निजामशाहीत अंतर्गत मतभेद सुरू होते. अशा कठीण परिस्थितीत राणी चांदबीबी यांनी अल्पवयीन बहादूर निजामशाह यांच्या वतीने राज्यकारभार स्वीकारला आणि अहमदनगरच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली. मुघल सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्यावर जोरदार तोफगोळ्यांचा मारा केला. या माऱ्यात किल्ल्याच्या तटबंदीचा एक मोठा बुरूज कोसळला. शत्रूला वाटले की आता किल्ला सहज जिंकता येईल. मात्र राणी चांदबीबी यांनी विलक्षण धैर्य, नियोजन आणि तत्परता दाखवली. त्यांनी रातोरात हजारो कामगार, सैनिक, गवंडी आणि कारागीर यांना कामाला लावले. दगड, माती, लाकूड आणि उपलब्ध बांधकाम साहित्य वापरून तुटलेल्या जागी तात्पुरती पण मजबूत तटबंदी उभारण्यात आली. पहाटे मुघल सैन्याने पुन्हा हल्ला केला तेव्हा रात्रीपर्यंत पडलेली जागा पुन्हा भक्कम झालेली पाहून ते आश्चर्यचकित झाले. या घटनेने राणी चांदबीबी यांच्या नेतृत्वाची आणि व्यवस्थापन कौशल्याची प्रचिती संपूर्ण भारताला आली.राणी चांदबीबी स्वतः घोड्यावर स्वार होऊन, हातात तलवार घेऊन सैनिकांचे नेतृत्व करत असत. त्यांच्या उपस्थितीमुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होत असे. त्यांनी अनेक महिने मुघल सैन्याला किल्ल्याबाहेर रोखून धरले आणि शेवटी तह करून निजामशाहीचे अस्तित्व काही काळ टिकवून ठेवले.मात्र पुढे निजामशाहीतील काही सरदारांमध्ये सत्तासंघर्ष आणि मतभेद वाढले.



इ.स. १५९९ मध्ये राणी चांदबीबी या मुघलांशी तह करून राज्य वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याची अफवा पसरवण्यात आली. या अफवेवर विश्वास ठेवून त्यांच्याच दरबारातील सरदार हमीद खान (काही ऐतिहासिक नोंदींमध्ये हिजडा हमीद खान असा उल्लेख आढळतो) याने संतप्त सैनिकांना भडकवले. त्यानंतर सैनिकांनी राजवाड्यात घुसून राणी चांदबीबी यांची निर्घृण हत्या केली. त्यांच्या मृत्यूनंतर अहमदनगरच्या संरक्षणाची ताकद कमी झाली आणि काही काळातच मुघलांनी अहमदनगर काबीज केले.

राणी चांदबीबी यांच्या राजवटीतील काही महत्त्वाच्या घटना इतिहासात विशेष उल्लेखनीय आहेत.

अहमदनगरच्या किल्ल्याचे यशस्वी संरक्षण आणि मुघल सैन्याला अनेक महिने रोखून धरणे. अल्पवयीन बहादूर निजामशाह यांच्या नावाने राज्यकारभार अत्यंत सक्षमपणे चालवणे.अंतर्गत बंडाळ्या आणि सरदारांतील संघर्ष असूनही राज्य एकत्र ठेवण्याचा प्रयत्न. युद्धकाळात प्रशासन, अन्नपुरवठा आणि संरक्षण व्यवस्था प्रभावीपणे सांभाळणे.संकटाच्या वेळी संयम, मुत्सद्दीपणा आणि धाडस यांचा उत्कृष्ट संगम घडवून आणणे.राणी चांदबीबी यांचे जीवन हे स्त्रीशक्ती, नेतृत्व आणि राष्ट्रनिष्ठेचे अद्वितीय उदाहरण आहे. त्यांनी दाखवून दिले की संकट कितीही मोठे असले तरी धैर्य, बुद्धिमत्ता आणि आत्मविश्वास यांच्या बळावर त्याचा सामना करता येतो. त्यांचा पराक्रम केवळ अहमदनगरचाच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या इतिहासाचा अमूल्य वारसा आहे.

आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण त्यांच्या शौर्य, त्याग आणि स्वाभिमानाचा आदर्श समोर ठेवून समाजहित, राष्ट्रहित आणि मानवतेची सेवा करण्याचा संकल्प करूया.

**ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी राही कॉम्प्युटर्सचे कार्य प्रेरणादायी**

## कौशल्याधारित शिक्षण काळाची गरज – आमदार अक्षयदादा कर्डिले




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण, संगणक साक्षरता आणि कौशल्याधारित प्रशिक्षण देत त्यांना रोजगारक्षम बनविण्याचे उल्लेखनीय कार्य राही कॉम्प्युटर अँड टायपिंग इन्स्टिट्यूट करत असून, अशा संस्था ग्रामीण भागासाठी प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन नगर-राहुरी-पाथर्डी मतदारसंघाचे आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले यांनी केले.

राही कॉम्प्युटर अँड टायपिंग इन्स्टिट्यूटच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व चालू बॅचच्या निरोप समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य काशिनाथ हापसे तसेच मा. आमदार शिवाजीराव कर्डिले महाविद्यालयाचे अध्यक्ष किरण पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार कर्डिले म्हणाले, ''आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर प्रत्यक्ष कौशल्य, ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आत्मसात करणे आवश्यक आहे. मोबाईल आणि डिजिटल साधनांचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता स्वतःचे कौशल्य विकसित करण्यासाठी करावा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार संगणक शिक्षण उपलब्ध करून देण्याचे राही कॉम्प्युटर्सचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.''

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि डिजिटल युगातील विविध क्षेत्रांतील संधींबाबत मार्गदर्शन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी एमएस-सीआयटी (-) परीक्षेत ५० पैकी ५० गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या कु. शेख उम्मे ऐमन शेख हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच एमएस-सीआयटी अभ्यासक्रमातील गुणवंत विद्यार्थी, - टायपिंग परीक्षा उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी आणि सारथी, पुणे यांच्या डिप्लोमा अभ्यासक्रमातून यश मिळवून स्वावलंबी बनलेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

## शब्दकोडे क्रमांक : ६



**<u>आडवे शब्द</u> :** १. गोमाता २. अश्व ३. मग गोळा करते ती माशी ७. मासा पकडण्यासाठी याचा वापर करतात ८. वानर ९. प्रजा ११. पक्ष्यांचा समूह १२. इंग्रजी वर्णमालेतील सोळावे वर्ण १४. मैल १६. होकार १८. हिंदी सिनेसृष्टीतील एक जुन्या काळातील संगीतकार २१. छाती ठोकपणे सांगितलेला अधिकार २३. लग्नाची मिरवणूक २५. माराचे वण २७. पटाईत २८. जागा २९. एक कवडीमोल चलन ३१. पूर्वी वापरायचे ती लाकडी लेखणी ३२. दरारा ३३. बंधन ३४. पुत्रासह ३६. परवडणाऱ्या दरातला ३८. फायदा ४०. सबब ४२. सरिता ४५. सैनिक ४७. नवरा ४९. मुख्य गायकासोबत गाळणारा सहाय्यक गायकाचा ताफा ५२. समास ५४. हा बेचव ५६. सुट्टी ५७. मातीचा जोडीदार ५८. रोकड ५९. लीन

**<u>उभे शब्द</u> :** १. ग्राम २. घोटाळा ३. मध ४. माने खालील शरीर ५. मुंडके ६. लुगडे ७. एक शेंग भाजी १०. संगीतातील एक राग १३. दृष्टिक्षेपात असलेला १५. एक पिठाचा प्रकार १७. मुलीचा नवरा १८. आपले विचार १९. आश्चर्य २२. गाईचे पिल्लू २४. हिंदीत रात्र २६. चार चाकी वाहन २८. धाप ३०. चिंतन ३१. सतत बोलणारा ३३. नूतन ३४. उत्सव ३५. देह ३७. सातू ३९ खूप ४१. एक सत्वगुण ४३. दिवा ४४. दूध ४६. होकार-विरुद्ध ४८. तीन दशक म्हणून तयार होणारे संख्या ४९. आमटी थांबत पण यासाठी वापरतात ५०. चितेवर रचलेली लाकडे ५१. पर्ण ५३. नासिका ५५. पंख

**शब्दकोडे क्रमांक : ५ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शा | ळा | | शि | क्ष | क | | सा | व | ली | | गा |
| ई | | कि | र | ण | | आ | ता | | ला | क | डी |
| | प | ड | का | | वि | | रा | वा | | टी | |
| दै | ना | | व | र | दा | न | | टा | टा | | बा |
| | मा | वा | | म | र | | चा | | प | हा | रा |
| वी | | र | वा | | क | र | त | ल | | व | |
| र | न | | स | वा | | हा | क | | र | डा | र |
| | स | पा | | प | हा | ट | | र | ण | | ब |
| आ | | वा | य | र | ल | | ग | | गा | ज | र |
| ग | ती | | मु | | त | र | | प | डा | व | |
| डो | | जु | ना | ट | | स | ल | ग | | स | सा |
| ब | ग | ळा | | का | म | ना | | ला | ल | | प |

## मतदार यादी पुनरीक्षणासाठी शिवसेनेची जनजागृती मोहीम; पैठण शहरातील बीएलओ यांची संपर्क यादी जाहीर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण २०२६ अभियानाच्या पार्श्वभूमीवर पैठण शहरात मतदार जनजागृती मोहिमेला वेग आला आहे. नागरिकांनी मतदार यादीतील नावाची नोंद, दुरुस्ती व पडताळणी वेळेत पूर्ण करून मतदानाचा घटनात्मक अधिकार सुरक्षित ठेवावा, असे आवाहन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत पैठण शहरातील बूथ क्रमांक २७१ ते ३०६ पर्यंतच्या सर्व (बूथ लेव्हल अधिकारी) यांची नावे व संपर्क क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले आहेत. नागरिकांना आवश्यक ती मदत थेट संबंधित कडून मिळावी, हा यामागील उद्देश आहे. मतदार यादीतील आवश्यक कामांसाठी दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड, मतदार ओळखपत्र व मोबाईल क्रमांक सोबत ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

नगराध्यक्षा सौ. विद्या भूषण कावसानकर व माजी नगरसेवक भूषण भागवानराव कावसानकर यांनी नागरिकांनी यांना सहकार्य करून मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे ही लोकशाही बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा १८ जुलै रोजी होणार

अहिल्यानगर - येथील अनुदानप्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांची सहकारी पतसंस्थेची ३५वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष श्रीनिवास म. मुत्याल यांच्या अध्यक्षतेखाली येत्या शनिवारी (दि. १८) रोजी सायंकाळी ५ वाजता श्री समर्थ विद्या मंदिर (सांगळे गल्ली, नगर) येथे होत आहे. या सभेसाठी सभासदांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मानद सचिव अ. श. महाजन यांनी केले आहे. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, गेल्या वर्षीचा अध्यक्षांचा अहवाल वाचून मंजूर करणे, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून मंजूर करणे, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे, २०२५-२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे, चालू सालाकरिता व्यवस्थापक समितीने तयार केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे, चालू वर्षीसाठी हिशेब तपासणीसाची नेमणूक करणे, अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त खर्चास मंजुरी देणे, दोष दुरूस्ती अहवाल वाचून मंजूर करणे, उपविधी दुरूस्त करणे आदि विषय या सभेमध्ये सभासदांच्या उपस्थितीत चर्चेसाठी घेण्यात येणार आहेत. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी आलेल्या विषयांचाही यामध्ये समावेश आहे. संस्थेचा वार्षिक अहवाल आणि हिशेबासंबंधी स्पष्टीकरणासंदर्भात काही प्रश्न वा सूचना असल्यास लेखी स्वरूपात त्या मानद सचिव अ. श. महाजन अथवा लेखनिक सु. द. कुलकर्णी यांच्याकडे १५ जुलैपर्यंत द्याव्यात. यासंदर्भातील कागदपत्रे याच दिवशी सकाळी १०.३० ते ३ या वेळेत पहावयास मिळतील. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी ही सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू करण्यात येईल. यास गणसंख्येचे बंधन नसेल, असे कळविण्यात आले आहे. सेवानिवृत्त व आदर्श शिक्षक तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सभेनंतर मान्यवरांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. यासाठी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांनी त्यांची मार्कशीटची सत्यप्रत कार्यालयात पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### कामाच्या तणावावर क्रिकेटचा दिलासा; फ्रेंड्स मॉन्सून क्रिकेट लीग कॉर्पोरेटला उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर - कॉर्पोरेट क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गाला दैनंदिन कामाच्या तणावातून दिलासा मिळावा, त्यांच्यामध्ये सांघिक भावना, मैत्री आणि निरोगी स्पर्धेची जाणीव वाढावी या उद्देशाने फ्रेंड्स मॉन्सून क्रिकेट लीग कॉर्पोरेट या अनोख्या क्रिकेट स्पर्धेचे रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये सहा संघांचा सहभाग आहे. या स्पर्धेचे आयोजन तेजस करमरकर, प्रकाश राठोड आणि चैतन्य खोलगडे यांनी केले असून, साईदीप हिरोजचे अध्यक्ष संदीप घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी माजी रणजी क्रिकेटपटू अनुपम संकलेचा तसेच उद्योजक वसीम हुंडेकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना, कॉर्पोरेट क्षेत्रातील धकाधकीच्या जीवनात मानसिक व शारीरिक आरोग्य जपण्यासाठी अशा क्रीडा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी झालेल्या सामन्यांमध्ये नगर डिस्ट्रीक्ट सिनियर विरुद्ध क्रिकेट स्टार करंजी आणि नगर चॅम्पियन्स विरुद्ध शिवराज ॲड्वोकेट्स वॉरियर असे सामने खेळवण्यात आले. यामध्ये नगर डिस्ट्रीक्ट सिनियर आणि शिवराज ॲड्वोकेट वॉरियर यांनी अनुक्रमे विजय मिळवला. ही लीग विशेषतः कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचारी वर्गासाठी असून, सामने दर शनिवार आणि रविवारी आयोजित करण्यात येणार आहेत. आठवडाभराच्या कामाच्या तणावातून मुक्तता मिळावी, सहकाऱ्यांमध्ये सुसंवाद व टीमवर्क वाढावे आणि खेळाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळावे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेला विविध कंपन्यांतील खेळाडू व क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आगामी काळात या लीगचे अधिक व्यापक स्वरूपात आयोजन करून कॉर्पोरेट क्षेत्रातील अधिकाधिक कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# समर्पण धर्मयात्रेत स्थानकवासी–मंदिरमार्गी जैन संप्रदायाचे अभूतपूर्व ऐक्य

**सप्तकसदन येथे हजारो जैन बांधवांच्या उपस्थितीत धर्मजागृतीचा प्रेरणादायी सोहळा; समर्पण चातुर्मासाची उत्साहपूर्ण नांदी**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सन २०२६ च्या बहुप्रतीक्षित 'समर्पण चातुर्मास' पर्वाची उत्साहपूर्ण नांदी ठरलेल्या समर्पण जैन धर्मयात्रेचे सोमवार, दि. १३ जुलै रोजी शहरातील सप्तकसदन, खिस्त गल्ली येथे अत्यंत मंगलमय वातावरणात आणि जयघोषाच्या गजरात भव्य स्वागत करण्यात आले. धर्मजागरणाचा संदेश देणाऱ्या या धर्मयात्रेत हजारो जैन बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत धार्मिक ऐक्य, श्रद्धा आणि समर्पणाची प्रेरणादायी अनुभूती घेतली.

प. पू. श्री प्रवीण ऋषी म.सा. यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या धर्मयात्रेला प. पू. श्री तिर्थेश ऋषीजी म.सा., मंदिरमार्गी परंपरेतील प. पू. श्री ज्ञानप्रेम विजयजी म.सा. आणि श्री हितप्रेम विजयजी म.सा. यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विविध भागांतून मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या जैन समाजाने धर्मयात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

सकल जैन समाज बुरुड गल्ली, खिस्त गल्ली, हलवाई गल्ली, जुना बाजार, चर्च रोड आणि परदेशी गल्ली यांच्या वतीने आयोजक बाळासाहेब भंडारी, किरण शिंगी, पवन गुंदेचा, सचिन चोपडा व समाजबांधवांनी धर्मयात्रेचे भावपूर्ण स्वागत केले.

या धर्मयात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे कापडबाजार जैन मंदिरात मंदिरमार्गी जैन समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले स्वागत. प. पू. श्री ज्ञानप्रेम विजयजी म.सा. व श्री हितप्रेम विजयजी म.सा. यांच्या उपस्थितीत प. पू. श्री प्रवीण ऋषी म.सा. व श्री तिर्थेश ऋषीजी म.सा. यांचे सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. त्यानंतर मंदिरमार्गी आणि स्थानकवासी समाजातील सर्व श्रद्धाळू एकत्रितपणे धर्मयात्रेत सहभागी झाले. हा प्रसंग जैन समाजासाठी अत्यंत दुर्मिळ, प्रेरणादायी आणि ऐतिहासिक ठरला.

धर्मसभेच्या प्रारंभी बाळासाहेब भंडारी यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर सौ. राखी गांधी, सौ. स्मिता बोगावत, स्वाती चोपडा आणि सौ. पूजा चुत्तर यांनी सुमधुर स्वागतगीत सादर करून उपस्थितांना भक्तिरसात चिंब केले.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष बाबुशेठ बोरा यांनी आपल्या मनोगतात समर्पण चातुर्मासातील विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची सविस्तर माहिती देत सर्व समाजबांधवांनी प्रत्येक कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी संदीप गांधी यांनीही मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर प. पू. श्री प्रवीण ऋषी म.सा., प. पू. श्री ज्ञानप्रेम विजयजी म.सा. आणि प. पू. श्री हितप्रेम विजयजी म.सा. यांनी धर्मजागृती, धर्माचरण, संस्कार, आत्मोन्नती आणि सामाजिक ऐक्य या विषयांवर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांना धर्माचरणाची नवी दिशा दिली.

यानंतर प. पू. श्री तिर्थेश ऋषीजी म.सा. यांनी आपल्या मधुर स्वरात सादर केलेल्या भावपूर्ण धर्मभजनाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. मंगलपाठानंतर आयोजित नवकारसी कार्यक्रमाने धर्मसभेची सांगता झाली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे स्थानकवासी आणि मंदिरमार्गी या दोन्ही जैन परंपरांतील पूज्य महाराज साहेबांनी धर्मयात्रा आणि धर्मसभेत एकत्र सहभागी होत अखिल भारतीय जैन समाजासमोर ऐक्याचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. अहिल्यानगरमध्ये कोणताही पंथवाद नसून ''सकल जैन समाज एक आहे'' हा अत्यंत सकारात्मक आणि ऐतिहासिक संदेश या सोहळ्यातून संपूर्ण देशभर पोहोचला.

कार्यक्रमास कापडबाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा, शैलेश मुनोत, अनिल पोखरणा, विलास कटारिया, इश्वर बोरा, संदीप गांधी यांच्यासह नागापूर, सावेडी, महावीर नगर, सिव्हिल हडको, भिंगार, विनायकनगर आणि केडगाव श्रीसंघांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध भागांतील हजारो जैन समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवृत्तीनाथ महाराज दिंडीचे डोंगरे सामाजिक संस्थेच्या वतीने स्वागत


दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी सोहळ्याचे शहरातील मार्केट यार्ड परिसरात स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय, निमगाव वाघा यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते दिंडीतील रथाचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी किसान पतसंस्थेचे सचिव महादेव पाचारणे, संगीता पाचारणे, दत्ता सातपुते, पै. संदीप डोंगरे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, ''वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, अध्यात्माचा आणि सामाजिक एकात्मतेचा अमूल्य वारसा आहे. विठ्ठलाच्या भेटीसाठी हजारो वारकरी पायी प्रवास करतात. या विठ्ठलभक्तांचे स्वागत करणे आणि त्यांची सेवा करणे हे प्रत्येकासाठी मोठे भाग्य आहे. वारकरी परंपरेने समाजाला समता, बंधुभाव, संयम आणि निस्वार्थ सेवेची शिकवण दिली आहे. ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. पै. किसनराव डोंगरे यांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून आमची संस्था सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे.

# तंजावरचे राजाराम राजा साहेब: सामाजिक क्रांतीचे अग्रदूत



**११३ व्या जयंती निमित्ताने विशेष लेख**
**१६ जुलै रोजी जयंती आहे**

भारताच्या गौरवशाली इतिहासात अनेक राज्यकर्त्यांनी केवळ युद्धेच जिंकली नाहीत, तर सामाजिक सुधारणांमध्येही मोठे योगदान दिले. अशीच एक प्रमुख व्यक्ती म्हणजे तंजावरच्या मराठा घराण्याचे राजाराम राजा साहेब. १९३९ मध्ये त्यांनी एक ऐतिहासिक निर्णय घेतला, ज्याने केवळ तंजावरचाच नव्हे तर संपूर्ण भारताचा सामाजिक मार्ग बदलून टाकला.

१९३० ते १९८५ पर्यंत, राजाराम राजा साहेब यांनी तंजावरमधील सर्व ९० मंदिरांचे वंशपरंपरागत विश्वस्त ( ) म्हणून काम पाहिले. त्यांच्या देखरेखीखाली अनेक प्राचीन मंदिर उत्सव आणि परंपरांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. यातील सर्वात महत्त्वाचा सोहळा म्हणजे तब्बल १८० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर १९८० मध्ये झालेला बृहदीश्वर मंदिराचा कुंभाभिषेक होय. ही केवळ एक धार्मिक घटना नव्हती, तर सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने उचललेले एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल होते.

तथापि, राजाराम राजा साहेब यांचे सर्वात मोठे योगदान सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात होते. महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निवारण चळवळीतून प्रेरणा घेऊन त्यांनी १५ जुलै १९३९ रोजी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आणि तंजावरमधील सर्व ९० मंदिरे वंचित/शोषित वर्गासाठी (ज्यांना तत्कालीन परिभाषेत ''हरिजन'' म्हटले गेले) खुली करत असल्याची घोषणा केली. हा निर्णय कोणत्याही कायदेशीर सक्तीमुळे किंवा राजकीय दबावामुळे घेतलेला नव्हता; तर तो पूर्णपणे त्यांच्या नैतिक विश्वासावर, सामाजिक न्यायावर आणि समतेच्या वचनबद्धतेवर आधारित होता. या कृतीने भारताच्या सामाजिक क्रांतीच्या प्रवासात तंजावरला एक महत्त्वपूर्ण स्थान मिळवून दिले.

**महात्मा गांधींचे कौतुक**

महात्मा गांधींनी या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले. शेगाव येथून २९ जुलै १९३९ रोजी लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी नमूद केले की: ''राजाराम राजा साहेब यांनी ९० मंदिरे हरिजनांसाठी खुली करणे हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि चांगला निर्णय आहे, जो हिंदू धर्माच्या शुद्धीकरणाच्या प्रक्रियेला गती देतो. अस्पृश्यता हा हिंदू धर्माला लागलेला मोठा कलंक आहे आणि तो पुसून टाकण्यासाठी असे धाडसी निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे.

राजाराम राजा साहेब केवळ मंदिरे खुली करण्याची घोषणा करून थांबले नाहीत; तर शोषित वर्गाला सन्मानाने मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांनी मंदिराच्या सर्व अधिकार्यांना स्पष्ट सूचना दिल्या की त्यांनी या बांधवांना इतर सर्व हिंदूंच्या बरोबरीने वागवावे. इतकेच नाही तर, मंदिरात येणाऱ्या नवीन भाविकांचा सन्मान करावा अशा स्पष्ट सूचना त्यांनी वैयक्तिकरित्या मंदिर प्रशासनाला दिल्या होत्या. त्यांच्या या धाडसी निर्णयामुळे तंजावरच्या शोषित वर्गामध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला आणि समाजात आपल्याला समान दर्जा मिळाल्याची भावना निर्माण झाली.

**तंजावर मंदिर प्रवेश चळवळीचा सविस्तर घटनाक्रम (१९३९ आणि त्यानंतर)**

ऐतिहासिक दस्तऐवजांच्या आधारे, या महत्त्वपूर्ण सामाजिक सुधारणेचा कालानुक्रम खालीलप्रमाणे आहे: १९३० – १९८५: राजाराम राजा साहेब यांनी पॅलेस देवस्थानमचे वंशपरंपरागत विश्वस्त म्हणून ९० मंदिरांच्या प्रशासनाचा कार्यभार सांभाळला. या काळात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या, तरी त्यांचे सामाजिक सुधारणेचे कार्य सर्वात श्रेष्ठ मानले जाते.

१९३५ (आणि त्यापूर्वी): ऐतिहासिक नोंदींवरून असे दिसून येते की, १९३५ पर्यंत राजाराम राजा साहेब यांचा असा ठाम विश्वास झाला होता की, देवतेच्या समोर कोणताही जातीवर आधारित भेदभाव करणे हे पूर्णपणे चुकीचे आहे.

जून/जुलै १९३९: श्री व्ही. बुवराघवा अय्यंगार (आमदार) यांनी पॅलेस देवस्थानमच्या विश्वस्तांना पत्र लिहून हरिजनांच्या एका गटाला दर्शनासाठी मंदिरात प्रवेश देण्याची परवानगी मागितली.

१५ जुलै १९३९: हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासात सुवर्णअक्षरांनी कोरला गेला आहे. राजाराम राजा साहेब यांनी त्यांच्या ताब्यातील सर्व ९० मंदिरे स्वेच्छेने खुली करण्याची घोषणा केली.

१६ जुलै १९३९ (पहाट/सकाळ): विश्वस्तांच्या आदेशानुसार, सकाळी ८:०० वाजता, प्रसिद्ध आणि प्राचीन श्री बृहदीश्वर मंदिर (ज्याला ''मोठे मंदिर'' किंवा पेरिया कोविल असेही म्हणतात) हरिजनांसाठी खुले करण्यात आले.

१६ जुलै १९३९ (मंदिर प्रवेश सोहळा): हरिजनांचा एक मोठा गट या ऐतिहासिक प्रवेशासाठी आला, ज्यांचे नेतृत्व श्री व्ही. बुवराघवा अय्यंगार (आमदार), त्यांच्या पत्नी, श्री एस. ए. सांबसिवम पिळ्ळई (अध्यक्ष, जिल्हा हरिजन सेवक संघ) आणि श्री कुलंदा वेलू नयनार (आमदार) यांनी केले.

स्वागत: पॅलेस देवस्थानमच्या प्रतिनिधींनी, ज्यात श्री कृष्णाजी महाडिक राव साहेब, श्री जे. एम. सोमसुंदरम पिळ्ळई (अधीक्षक) यांचा समावेश होता, या समूहाचे अधिकृत स्वागत केले.

दर्शन आणि प्रार्थना: या समूहाने मुख्य गाभाऱ्यात प्रार्थना केली, प्रसाद घेतला आणि दर्शनासाठी देवतेच्या सन्मुख गेले.

वातावरण: संपूर्ण वातावरण आनंद आणि भक्तीने भरून गेले होते, नवीन भाविक ''जय महात्मा गांधी'' अशा घोषणा देत होते. ही बातमी शहरात वेगाने पसरली आणि अनेक नागरिक प्रत्यक्ष साक्षीदार होण्यासाठी तिथे जमा झाले.

जुलै/ऑगस्ट १९३९ (अधिकृत जाहीरनामा): सर्व ९० मंदिरांसाठी या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विश्वस्तांनी एक अधिकृत जाहीरनामा जारी केला. यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते की, शोषित वर्गाला मंदिरात प्रवेश करण्याचा आणि पूजा करण्याचा समान अधिकार आहे, तसेच सर्व पुजारी आणि अधिकार्यांना असे निर्देश देण्यात आले की त्यांनी या बांधवांना सर्व पारंपारिक सुविधा आणि आदर मिळेल याची खात्री करावी.

१९३९ (विरोध): या सुधारणेला काही सनातनी गटांकडून विरोधाचा सामना करावा लागला. नोंदींवरून असे दिसून येते की, मंदिर प्रवेशाच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी तंजावर वैदिक धर्म संघ यांच्या नेतृत्वाखाली एक सभा आयोजित करण्यात आली होती.

१९३९ (पुढील घडामोडी): मोठ्या मंदिरात (बृहदीश्वर मंदिर) प्रवेश केल्यानंतर, हरिजनांच्या या गटाने श्री सुब्रमण्य, अम्मान देवी, भगवान नटराज आणि इतर देवतांच्या चरणी प्रार्थना केली.

**वारसा आणि प्रभाव**

त्यानंतरच्या काळात, राजाराम राजा साहेब यांच्या कृतीमुळे शोषित वर्गामध्ये एक नवा आत्मविश्वास आणि सामाजिक समतेची भावना निर्माण होण्यास मदत झाली. हा निर्णय संपूर्ण भारतासाठी एक प्रेरणादायी संदेश ठरला, ज्यामुळे देशभरातील अस्पृश्यता विरोधी चळवळीला गती मिळाली. तंजावरची ही ऐतिहासिक मंदिर प्रवेशाची घटना राजाराम राजा साहेब यांच्या सामाजिक न्याय, समता आणि त्यांच्या धाडसी नेतृत्वावरील अढळ विश्वासाचे एक चमकदार उदाहरण म्हणून आजही कायम आहे.

त्यांचा हा ऐतिहासिक निर्णय आजच्या आपल्या समाजालाही प्रेरणा देत आहे. समता आणि न्यायाच्या तत्त्वांवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी धाडसी निर्णय किती आवश्यक असतात, हे यावरून दिसून येते. त्यांनी दिलेला संदेश आपल्या सर्वांना अधिक सर्वसमावेशक आणि न्यायी समाज निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रेरित करत राहील.

डॉ. शरद गोरे
राष्ट्रीय अध्यक्ष
अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद

**ठेवीदारांच्या लढ्याला मोठे यश!**

# पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन, संचालक व व्यवस्थापक यांचा जामिन नामंजूर!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** फिर्यादी अमेय रमेश मुदकवी यांनी मुदत ठेवीची रक्कम परत मिळण्यासाठी व ठेवीदारांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणी केलेल्या न्यायालयीन दाव्यामध्ये सोमवारी (दि. १३) पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगाव या संस्थेच्या चेअरमन, सर्व संचालक व अहिल्यानगर शाखा व्यवस्थापक यांना जामीन नामंजूर केला. श्री. आर. एस. गुप्ता यांच्या न्यायालयात हा युक्तिवाद झाला.

गेल्या दि. १५ मे रोजी या पतसंस्थेचे चेअरमन सत्यशिल अकोले हे नगर येथे पतसंस्था कार्यालयात सायंकाळच्या वेळी आले असता येथे शेजारी राहणारे एक ठेवीदार यांना ते दिसल्यानंतर त्यांनी लगोलग इतर ठेवीदारांना यासंबंधी मोबाईल व्हॉटस्ॲप ग्रुपवरून माहिती दिली आणि अवघ्या काही मिनिटात ठेवीदारांनी येथे मोठी गर्दी केली. यातीलच ठेवीदारांनी कोतवाली पोलिस स्टेशनला याची माहिती दिली. पोलिसांनीही त्वरित कार्यवाही करून येथे भेट दिली आणि चेअरमन सत्यशिल अकोले यांच्यासह स्थानिक संचालक जितेंद्र कुलकर्णी व नगर शाखा व्यवस्थापक महेश कुलकर्णी यांना पोलिस स्टेशनला नेले.

या दिवशी त्यांना पोलिसांनी अटक करावी, यासाठी ठेवीदारांनी रात्री उशिरापर्यंत पोलिस स्टेशनला ठिय्या आंदोलन केले. याबाबत रात्री उशिरा कोतवाली पोलिस स्टेशनला आरोपींविरोधात बी.एन.एस. कलम ३(५), ३१६, ३१८, ३३६, ६१ आणि एम.पी.आय.डी., १९९९ चे कलम ३ व ४ नुसार पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगाव, शाखा अहिल्यानगरचे चेअरमन, सर्व संचालक, शाखा व्यवस्थापक यांच्याविरुद्ध त्यांनी केलेल्या ठेवीदारांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणी श्री. अमेय मुदकवी यांनी गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शिशीरकुमार देशमुख व त्यांचे सहकारी पोलिस कॉन्स्टेबल बबलू शेख यांनी तपास केला असता, या गुन्ह्याची व्याप्ती ३७ कोटी रुपयांपर्यंत तपासादरम्यान आढळून आली. यानुसार सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी संस्थेचे चेअरमन ॲड. सत्यशिल अकोले (जळगाव), नगरचे स्थानिक संचालक जितेंद्र कुलकर्णी आणि नगर शाखा व्यवस्थापक महेश कुलकर्णी यांना अटक करून कारागृहामध्ये ठेवण्यात आले आहे. इतर आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत.

या प्रकरणात फसवणूक झालेल्या इतर राहिलेल्या ठेवीदारांना त्यांचे जाबजबाब व कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अटक आरोपी संस्थेचे चेअरमन ॲड. सत्यशिल अकोले (जळगाव), नगरचे स्थानिक संचालक जितेंद्र कुलकर्णी आणि नगर शाखा व्यवस्थापक महेश कुलकर्णी यांनी मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर श्री. आर. एस. गुप्तासाहेब यांच्या न्यायालयात जामिन मिळण्याकरिता अर्ज दाखल केला होता. आरोपींचे वकील, सरकारी वकील, फिर्यादी व ठेवीदारांचे वकील आणि जळगाव येथील श्री. सुधाकर पाटील यांचा युक्तिवाद सोमवारी (दि. १३) ऐकण्यात आला. सरकारी वकील सौ. पुष्पा कापसे–गायके यांनी जामीन अर्जास जोरदार विरोध करुन आपले लेखी म्हणणे सादर केले.

फिर्यादी व ठेवीदारांचे वकील ॲड. विजय आर. गुंदेचा यांनी याप्रकरणी युक्तिवाद केला की, या गुन्ह्याची व्याप्ती खूप मोठी असून फसवणुकीची रक्कम वाढतच जात असून, सदर आरोपींनी मागील बर्याच वर्षांपासून ठेवी न स्वीकारण्याचे निर्देश असतानाही स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता, लाभाकरिता रकमा स्वीकारुन वेगवेगळ्या ठिकाणी मिळकती या ठेवीच्या रकमेतून खरेदी केलेल्या आहेत. सदर आरोपींचा या गुन्ह्यामध्ये प्रत्यक्षरित्या सहभाग आहे. या गुन्ह्याच्या तपासामध्ये सध्या फॉरेन्सिक ऑडिट चालू असून आरोपींविरुद्ध तात्पुरते दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. सदर गुन्ह्यामध्ये मुख्य आरोपी ॲड. सत्यशिल अकोले यांचे कुटुंबिय व निकटवर्तीय इतर संचालक यांचादेखील मोठा सहभाग असल्याचे मे. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सदर गुन्ह्यातील रक्कमा व मिळकती जप्त करुन ठेवीदारांना त्यांच्या रक्कमा व न्याय देण्याची विनंती केली. मे. न्यायालयाने फिर्यादी व ठेवीदारांचे वकील ॲड. विजय आर. गुंदेचा यांचा सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपींचा जामीन नामंजूर केला.

# स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्थेचा मराठा वधू–वर परिचय मेळावा उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था आयोजित भव्य मराठा वधू–वर परिचय मेळावा २०२६ आज उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या प्रतिसादात संपन्न झाला. समाजातील विवाहेच्छुक युवक–युवती व त्यांच्या पालकांनी या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेवक तथा उद्योजक श्री. नवनाथजी कातोरे उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते वधू–वर परिचय फॉर्मचे वाटप करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. नवनाथजी कातोरे यांनी भारतीय कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करत, विवाहानंतर एकत्र कुटुंब पद्धती जपण्याचा प्रयत्न करावा, कुटुंबातील नाती दृढ ठेवावीत आणि भारतीय संस्कृती व संस्कारांचे जतन करावे, असे भावनिक आवाहन उपस्थित युवक–युवतींना केले.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून भरोसा सेलच्या अधिकारी सौ. आयेशा शेख व सौ. पूनम डोंगरे यांनी विवाहापूर्वी जोडीदार निवडताना आवश्यक बाबी, परस्पर समजूतदारपणा, कायदेशीर व सामाजिक पैलू, तसेच सुरक्षित आणि सुदृढ वैवाहिक जीवनासाठी घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

महिला व बालकल्याण समिती सदस्या ॲड. अनुराधा येवले, यांनी विवाह जुळविताना व्यवसाय करणारे, उद्योजक तसेच आधुनिक शेती व्यवसायाशी निगडित युवकांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी कुटुंब उभारण्यासाठी हा दृष्टिकोन महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. पत्रकार गोरक्ष बांदल यांनी पत्रिका पाहण्याऐवजी वैद्यकीय चाचण्या व आर्थिक स्थिरता तपासणे आवश्यक आहे, असे सांगितले.

शेकडो विवाह जुळवणारे जेष्ठ तात्यासाहेब देशमुख यांनी ज्या युवकांचे तिशी उलटूनही विवाह जुळलेले नाही, त्यांनी क्षुल्लक कारणांमुळे घटस्फोट झालेल्या मुलींचा विचार करावा असे सुचवले.कार्यक्रमातील प्रश्नोत्तर सत्र विशेष आकर्षण ठरले. उपस्थित युवक–युवती व पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना मार्गदर्शकांनी समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले.

# अहिल्यानगर जिल्हास्तरीय कनिष्ठ गट ज्युनिअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

**१ व २ ऑगस्ट रोजी लोणी येथे रंगणार ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय कनिष्ठ गट मैदानी स्पर्धा (ज्युनिअर ॲथलेटिक्स) अजिंक्यपद स्पर्धा २०२६–२०२७' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आगामी १ आणि २ ऑगस्ट २०२६ रोजी लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पार पडणार असल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व क्वालिफायिंग स्टँडर्ड्स पूर्ण करणाऱ्या खेळाडूंची डेरवण (जि. रत्नागिरी) येथे दिनांक २७ ते ३० ऑगस्ट रोजी

येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. या स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करणे बंधनकारक असून, २८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत अधिकृत संकेतस्थळावर (://../_/२०२६) प्रवेशिका जमा करता येतील. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १४, १६, १८ आणि २० वर्षांखालील अशा चार वयोगटांचा समावेश असून, खेळाडूचे



वय किमान १२ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

खेळाडूंनी वय पडताळणीसाठी येथे येताना सक्षम प्राधिकाऱ्याचा जन्माचा दाखला (ज्याची नोंदणी जन्मानंतर दोन वर्षांच्या आत झालेली असावी), १० वीचे बोर्ड प्रमाणपत्र आणि आधार कार्ड ही मूळ कागदपत्रे सोबत आणणे गरजेचे आहे. शनिवार, १ ऑगस्ट रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून स्पर्धा स्थळी ऑनलाइन नोंदणी केलेल्या खेळाडूंना चेस्ट नंबरचे वाटप केले जाईल. स्पर्धा संपल्यानंतर चेस्ट नंबर जमा केल्यावर सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल, तर वयाची पडताळणी झाल्यानंतर आणि संबंधित खेळ प्रकारात किमान ४ खेळाडू असल्यास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

या स्पर्धेसाठी निवास व जेवण याची कोणतीही व्यवस्था आयोजकांकडून केली नसून, ती खेळाडू व पालकांनी स्वतः करावी लागणार आहे. तसेच स्पर्धेदरम्यान होणाऱ्या कोणत्याही दुखापतीला किंवा नुकसानीला असोसिएशन जबाबदार राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी दिनेश भालेराव ९९२३८३७८८८, श्रीरामसेतु आवारी ९३२२०१५०४६, जगन गवांदे ९८८१३२८१८६, सुजय बाबर ७५०७६८१७२६, यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# आजची जागरूकता म्हणजे उद्याचे सुरक्षित आरोग्य - डॉ. सीमा येन्डे





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आबासाहेब काकडे माध्यमिक विद्यालय येथे डॉ. धोंडे मॅडम वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय, शेवगाव यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात डॉ. सीमा येन्डे यांनी आजची जागरूकता म्हणजे उद्याचे सुरक्षित आरोग्य याबाबत जनजागृती करत गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा वाढता धोका, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय आणि एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व ..स्त्रियांमध्येच्या साठी आवश्यक स्क्रीनिंग टेस्ट, याविषयी मार्गदर्शन केले.

तसेच पालकांच्या विविध शंकांचे निरसन केले. विद्यार्थिनी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधून लसीकरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. डॉ. म्हस्के यांनी लसीबद्दल सविस्तर माहिती सांगितली.

यावेळी ग्रामीण रुग्णालय, शेवगाव येथील डॉक्टर व परिचारिका (नर्सेस) यांची टीम उपस्थित होती. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. ‘‘प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपचार‘‘ या संदेशासह मुलींच्या निरोगी आणि सुरक्षित भविष्यासाठी एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

# प्रेमसंबंधाच्या पार्श्वभूमीवर बलात्कार प्रकरणातील आरोपीस जामीन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रथम फास्ट ट्रॅक विशेष न्यायालय, अहिल्यानगर यांनी बलात्कार व धमकीच्या गुन्ह्यात अटक असलेल्या आरोपी वसीम गफूर शेख यास नियमित जामीन मंजूर केला.

सरकारी पक्षाच्या म्हणण्यानुसार, फिर्यादी युवतीची आरोपीशी इन्स्टाग्रामवर ओळख झाली होती. आरोपीने कुटुंबीयांना संदेश दाखवून बदनामी करण्याची धमकी देत तिला हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४ व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपीच्या वतीने ॲड. पंकज खराडे यांनी प्रभावी युक्तिवाद करत न्यायालयासमोर फिर्यादी व आरोपी यांच्यातील चॅट, छायाचित्रे व अन्य कागदपत्रे सादर केली. दोघांमधील संबंध हे परस्पर संमतीने व प्रेमसंबंधातून निर्माण झाले असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच तपास पूर्णत्वाच्या टप्प्यात असून आरोपीचा कोणताही गुन्हेगारी पूर्वइतिहास नसल्याने जामीन मंजूर करण्याची विनंती केली. त्यांना ॲड. तुषार जगताप, ॲड. अक्षय खाडे, ॲड. यश पांढाडे, ॲड. शुभम भिंगारदिवे, ॲड. चंद्रशेखर शेळके, ॲड. सलमान जहागिरदार, ॲड. सुधांशू देशपांडे, ॲड. डरांगे आणि ॲड. विक्रम वाडेकर यांनी साह्य केले.

न्यायालयाने उपलब्ध चॅट, छायाचित्रे व इतर कागदपत्रांचा विचार करून प्रथमदर्शनी दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याचे निरीक्षण नोंदविले. फिर्यादी ही २० वर्षांची सज्ञान असल्याचे तसेच तिच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या म्हणण्यावर स्वाक्षरी नसल्याची बाबही न्यायालयाने नोंदवली. तपास जवळपास पूर्ण झाला असून आरोपीला सुमारे एक महिना कारावास झाला आहे, तसेच त्याचा कोणताही गुन्हेगारी पूर्वइतिहास नसल्याने योग्य अटींसह जामीन मंजूर करण्यात आला. आरोपीला २५,००० च्या वैयक्तिक जातमुचलक्यावर व तितक्याच रकमेच्या जामीनदारावर मुक्त करण्याचे आदेश देण्यात आले असून साक्षीदारांवर दबाव न आणणे, धमकी न देणे व भविष्यात तत्सम गुन्हा न करणे अशा अटी घालण्यात आल्या आहेत.



आज प्रभाग समिती क्रमांक तीन वार्ड क्रमांक पाच घनकचरा व्यवस्थापन बाबत आढावा बैठक संपन्न झाली सदर मिटिंग मध्ये मा. उपमहापौर धनंजय भैया जाधव, नगरसेवक मोहित पंजाबी, नगरसेवक जितू भैय्या गंभीर, नगरसेवक महेश लोंढे , नगरसेवक दत्ता गाडेकर, डॉ.शंकर शेडाळे, स्वच्छता निरीक्षक ऋषिकेश वाल्मीक, प्रभागातील मुकादम मदतनीस, घंटागाडी सुपरवायझर उपस्थित होते. सदरच्या मीटिंगमध्ये मा. उपमहापौर धनंजय जाधव यांनी तसेच मा.नगरसेवक यांच्यामार्फत घनकचरा व्यवस्थापनाबाबत आढावा घेऊन कचराशून्य वॉर्ड करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. (छाया– जाकीर शेख)

# जो कर्तव्याचे पालन करतो त्याच्याकडे देव येतो – ह.भ.प. रामगिरी महाराज

## बारस्कर कुटुंबीयांच्या वतीने पुष्पवृष्टी, सावेडीत रंगला भव्य रिंगण सोहळा





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीनिमित्त श्रीक्षेत्र सरला बेट येथील श्री संत गंगागिरी महाराज वारकरी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरात आगमन होताच स्वर्गीय बाबासाहेब बारस्कर कुटुंबीयांच्या वतीने दिंडीचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. टाळ–मृदुंगाच्या गजरात, संत माऊली, तुकाराम आणि विठुरायाच्या नामस्मरणात तसेच पुष्पवृष्टी करत दिंडीचे स्वागत करण्यात आले. सावेडी परिसरात रंगलेल्या भव्य रिंगण सोहळ्याने आणि अश्वमेधाच्या आकर्षक सादरीकरणाने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

यावेळी ह.भ.प. रामगिरी महाराज यांचे स्वागत बारस्कर कुटुंबीयांच्या वतीने आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, बाळासाहेब बारस्कर, मनपा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, सचिन बारस्कर, माजी नगरसेवक सतीश बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, आकाश कातोरे, नगरसेविका शारदाताई ढवण, योगेश ठुबे, संजय ढोणे, दत्ता तापकिरे आदींनी केले.

प्रवचनात ह.भ.प. रामगिरी महाराज म्हणाले की, वारकरी संप्रदायाने समाजाला एकत्र ठेवण्याचे आणि समतेचा संदेश देण्याचे महान कार्य केले आहे. वारकरी अखंड भगवंताच्या नामाचा गजर करीत असतात. ज्ञानी–अज्ञानी, श्रीमंत–गरीब असा कोणताही भेद न करता सर्वांना स्वीकारणारा देव म्हणजे पांडुरंग होय.

‘‘भक्तांची वाट पाहणारा देव म्हणजे विठ्ठल. जो जो आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडतो, त्याच्याकडे देव स्वतः येतो,’’ असे सांगत त्यांनी कर्तव्य, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांचे महत्त्व अधोरेखित केले.

ते पुढे म्हणाले की, माता–पित्याची सेवा हीदेखील पांडुरंगाची सेवा आहे. संसारात मनुष्य कधी पुढे जातो तर कधी मागे पडतो. जीवनात परिवर्तन हे कायम असते; मात्र मन स्थिर ठेवण्यासाठी भगवंताच्या नामाचा जप आवश्यक आहे. धार्मिक कार्यक्रमातून माणसाला ऊर्जा, आनंद आणि सकारात्मक विचार मिळतात.

ह.भ.प. रामगिरी महाराज यांनी स्वर्गीय बाबासाहेब बारस्कर यांच्या कार्याचा गौरव करत सांगितले की, त्यांनी गेल्या ३६ वर्षांपासून श्रीक्षेत्र सरला बेट वारकरी पायी पालखी दिंडीची सेवा केली. आज त्याच सेवाभावी परंपरेचा वारसा बारस्कर कुटुंबीय समर्थपणे पुढे नेत आहेत, ही समाधानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, वारकरी संप्रदायाला शेकडो वर्षांची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. संतांची ही विचारधारा पुढे नेण्यासाठी युवकांनी मोठ्या संख्येने वारीत सहभागी होणे गरजेचे आहे. वारकऱ्यांचा भगवा ध्वज पाहिल्यानंतर प्रत्येकामध्ये नवचैतन्य निर्माण होते आणि अधिक काम करण्याची प्रेरणा मिळते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी भगव्या पताकेला गौरवाचे स्थान मिळवून दिले. बारस्कर कुटुंबाला गेल्या ३६ वर्षांपासून वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे त्यांचे भाग्य आहे. धार्मिक आणि आध्यात्मिक संस्कार जपत पुढील पिढीने आपली संस्कृती आणि परंपरा जतन करण्याचे कार्य केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

मनपा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, आमचे सासरे स्वर्गीय बाबासाहेब बारस्कर यांनी ३६ वर्षांपूर्वी श्रीक्षेत्र सरला बेट वारकरी पायी पालखी सोहळ्याचे स्वागत करून महाप्रसाद सेवेचा उपक्रम सुरू केला होता. तीच सेवा परंपरा आज बारस्कर कुटुंबीय अखंडपणे पुढे चालवत आहेत. या माध्यमातून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.

अपघातग्रस्त वारकऱ्यांना श्रद्धांजली; भेसळखोरांवर कारवाईचे स्वागत यावेळी ह.भ.प. रामगिरी महाराज यांनी अलीकडील अपघातात मृत्यू झालेल्या वारकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करत शोक व्यक्त केला. वारकऱ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने वारी करावी, स्वतःच्या आरोग्याची आणि जीवाची काळजी घ्यावी तसेच वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, तुकाराम मुंढे यांनी अन्नपदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी सुरू केलेली मोहीम कौतुकास्पद असून राज्यात अशा धाडसी अधिकाऱ्यांची गरज आहे. तसेच राम मंदिर चोरी प्रकरणाबाबत नाराजी व्यक्त करत मंदिरात चोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई व कडक शिक्षा झालीच पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. या विषयात राजकारण करण्याची गरज नसल्याचे सांगत आमदार संग्राम जगताप यांच्या हिंदुत्ववादी कार्याचेही त्यांनी कौतुक केले.

# रेसिडेन्शिअल हायस्कूलचा शिष्यवृत्ती परीक्षेत मानाचा तुरा; ३ राज्य गुणवत्ताधारक, ५२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रेसिडेन्शिअल हायस्कूल, अहिल्यानगर येथे इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. रामचंद्र दरे साहेब होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव श्री. मुकेश मुळे तसेच खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे मॅडम उपस्थित होत्या.

यावर्षी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचे ३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवण्यात यशस्वी झाले असून २१ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचे ३१ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचा, पालकांचा व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य श्री. जाधव व्ही. व्ही. यांनी प्रास्ताविक करत शिष्यवृत्ती परीक्षेचा सविस्तर लेखाजोखा मांडला. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून यशामागील परिश्रम, नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख पाहुणे श्री. मुकेश मुळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व समजावून सांगितले. भविष्यातील



तंत्रज्ञानाच्या गरजा लक्षात घेऊन लवकरच संस्थेमार्फत विद्यार्थ्यांसाठी कोडींग शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची आनंददायी घोषणा त्यांनी केली.

अध्यक्षीय समारोपात श्री. रामचंद्र दरे साहेब यांनी विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेतील उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या यशामागील शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री. पवार बी. एम., पर्यवेक्षक श्री. म्हस्के डी. सी., श्री. शरद सोनवणे, सौ. मरकड व्ही. के., सौ. वैशाली दारकुंडे तसेच शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रवींद्र देवढे यांनी प्रभावीपणे केले, तर उपप्राचार्य श्री. वांढेकर सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांना श्री नारळे जे. एन.,श्री कुटे एच.डी.,सौ मरकड व्ही. के , श्रीम ठुबे एम. यू, श्रीम. काळदाते जे. एस. श्रीम. चव्हाणके ए. सौ. धामणे जे. एस., श्री पाटील पी. ए., सौ दरे एस. बी., सौ. हराळ एम.पी., श्रीम म्हस्के पी. बी.,सौ साठे एस. पी., सौ निवडुंगे जे. एस., श्री अमृते पी. एम. श्री गावडे आर. आर.यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करणारा हा प्रेरणादायी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

(पान १ वरून)

## १३ रेखांकन मंजुरी प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याची आयुक्तांची लेखी कबुली... मग कारवाई कधी?

पत्रात संबंधित १३ प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचे मान्य करताना, मंजुरी रद्द झाल्यास विकासकांना भरलेली प्रीमियम रक्कम परत करावी लागेल आणि महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती त्यासाठी सक्षम नसल्याने शासनाने मार्गदर्शन करावे, अशी विनंती केली आहे. यावर शेख यांनी तीव्र आक्षेप घेत म्हटले आहे की, ‘‘बेकायदेशीर मंजुरी कायम ठेवण्यासाठी आर्थिक अडचणीचे कारण पुढे करता येत नाही. शासनाच्या आदेशांचे उल्लंघन आर्थिक कारणावरून नियमित करता येणार नाही. अन्यथा भविष्यात कोणतेही प्राधिकरण जाणूनबुजून बेकायदेशीर मंजुऱ्या देऊन नंतर आर्थिक अडचणीचे कारण सांगून त्यांना वैध ठरविण्याचा प्रयत्न करेल, जे कायद्याच्या राज्याला घातक ठरेल.‘‘ तसेच विकास शुल्क व प्रीमियममधून जमा झालेल्या निधीचा वापर नियमबाह्य पद्धतीने इतर कामांसाठी झाला आहे आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र लेखापरीक्षण चौकशी करावी त्यातून सत्यता समोरील मनपाकडे मोठ्या प्रमाणात विकास भार आणिप्रीमियम रक्कम जमा आहे शासनाला दिशाभूल करणारी माहिती सादर केलेली आहे शेख यांनी शासनाकडे केलेल्या मागण्यांमध्ये आयुक्त श्री डांगे यांचे दिनांक ७ जुलै २०२६ चे पत्र अमान्य करणे, संबंधित १३ रेखांकन मंजुऱ्या रद्द करणे, चौकशी निष्पक्षपणे पूर्ण करणे, तसेच तत्कालीन सहाय्यक संचालक श्री. चारठाणकर, तत्कालीन आयुक्त श्री. जावळे, विद्यमान आयुक्त श्री. डांगे, नगररचनाकार श्री. जोशी यांच्यावर कायदेशीर कारवाई करून परवानगी रद्द कराव, अशी मागणी शेख यांनी केली आहे.


### मृत्यू संदर्भात जाहीर नोटीस



नाव –पठारे स्वरा बापू.
पत्ता –मुक्काम पोस्ट एरंडोली, (पठारे वस्ती )
तालुका श्रीगोंदा.
जिल्हा– अहिल्यानगर.
पिन कोड– ४१३ ७०३.
जन्म दिनांक – ३०/० ९/ २०१४.
मृत्यू दिनांक –९/०१/२०२५.
वार–गुरुवार
मृत्यूची वेळ– सायंकाळी ५ वाजता.


## श्रीरामपूरमध्ये गांजासह एका आरोपीला अटक

चौकशीत हा गांजा बजरंग चौक येथील फकीर (पूर्ण नाव माहीत नाही) याने दिल्याचे आरोपीने सांगितले. सध्या फकीर हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार रमीजराजा आतार यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात कायदा (१९८५) कलम ८(क) आणि २०(ब)(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि श्रीरामपूर शहर पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली.

## यशोदा नगरात संत बहिणाबाई पायी दिंडीचे जल्लोषात स्वागत; ३०० वारकऱ्यांना महाप्रसाद

संख्येने उपस्थित होते. यावेळी वारकऱ्यांचे औक्षण करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच दिंडीतील सर्व वारकऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

स्वागत सोहळ्यानंतर भुजबळ परिवाराच्या वतीने दिंडीत सहभागी झालेल्या सर्व ३०० वारकऱ्यांसाठी निष्ठेने महाप्रसादाच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली. वारकऱ्यांनी भोजनाचा लाभ घेत आयोजकांचे मनापासून आभार व्यक्त केले. सेवाभावातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे उपस्थितांनी भुजबळ परिवाराचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमाला सोन्याबापू भुजबळ, बाळासाहेब भुजबळ, जवाहर भुजबळ, माऊली गायकवाड, रघुनाथ औटी, बबन काशीद, आशिष ताकपेरे, बाबू ताकपेरे, दिलीप शिंदे, शिवाजी दळवी, राजेंद्र ताकपेरे, संपत मदने, प्रशांत काळे, श्रीपाद वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी वारकऱ्यांच्या सेवेत सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी राजश्री भुजबळ, ओंकार–मयुरी भुजबळ, राजू–योगिता भुजबळ, सौरभ–साक्षी भुजबळ, अजिंक्य–शिवानी भुजबळ यांच्यासह संपूर्ण भुजबळ परिवाराने वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली. भक्तिभाव, सेवावृत्ती आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा स्वागत सोहळा वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाची आणि समाजातील ऐक्याची प्रेरणादायी परंपरा अधिक दृढ करणारा ठरला.

## हजारो वारकऱ्यांची सेवा हीच आमची विठ्ठलभक्ती - योगेश गलांडे

भावना व्यक्त केली.

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे म्हणाले, ही सेवा सुरू करण्यामागे फक्त शहरात दाखल होणाऱ्या वारकऱ्यांप्रती असलेली श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारीची भावना आहे. हजारो वारकऱ्यांची सेवा हीच आमच्यासाठी खरी विठ्ठलभक्ती आहे. या उपक्रमाचे हे पहिले वर्ष असले तरी भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात ही सेवा राबविण्याचा आमचा संकल्प आहे. दरवर्षी हजारो वारकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. वारकरी सुखरूप आणि आनंदाने पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतील, हीच आमच्यासाठी सर्वात मोठी समाधानाची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वैभव सुरवसे यांनी या स्वागत सोहळ्यात उद्योजक, कामगार आणि परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांनी एकदिलाने जबाबदाऱ्या पार पाडल्यामुळे हजारो वारकऱ्यांना सेवा देणे शक्य झाले. हा केवळ स्वागताचा कार्यक्रम नसून समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारा आणि सेवाभावाची प्रेरणा देणारा उपक्रम असल्याचे त्यानी सांगितले.

दिंडी स्वागतासाठी वैभव शेटिया, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, शंकर शेळके, नरेश शेळके, राजू काका शिवाळे, सरपंच डॉ. डोंगरे, अशोक शेळके, असलम इनामदार, संतोष कांबळे, सागर सप्रे, विनायक भोर, गोरख गव्हाणे, डॉ. ओजस मुनोत, डॉ. सिध्दी मुनोत, हर्षवर्धन देशपांडे, श्रीनिवास सिधम, अतुल झावरे, अमित बरावकर, वैभव सुरवसे, सुनील शेवाळे, राजू ढगे, नगरसेवक आकाश कातोरे, दिपक गिते, नगरसेवक बाबूशेठ नगरगोजे, राम घाडगे, शुभम बिडवे, डॉ. गडगे, विवेक घाडगे, अविनाश कार्डिले, दत्तात्रय तापकिरे, डॉ. शिवाजी लोंढे, सॅम्युअल पाटोळे, अजीनाथ शिरसाठ, दिपक परभने, भरत दिंडे, वैष्णव गलांडे, राहुल नळे, अंबादास वांढेकर, मनीष फिरोदिया, दत्ता जयभाय, शुभम बिडवे, केशव नगरगोजे, पवन क्षिरसागर आदी उपस्थित होते.

डॉ. शिवाजी लोंढे व सॅम्युअल पाटोळे यांनी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी केली. या सेवाभावी उपक्रमामुळे शहरात दाखल होणाऱ्या हजारो वारकऱ्यांना प्रवासादरम्यान मोठा दिलासा मिळाला.